Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

**Alumni Last Year Activity Report AY-2021-2022**

# 5.4.4

# DOCUMENT UPLOAD

**Organization of Swachyata Week - World Environment Day – 05th –13th June, 2022**




**Organization of Plantations - World Environment Day – 05th –13th June, 2022**



**Organization of Motivational Speech by Alumni Mr. Prashant Kolhe**
**On Teachers Day – 05.09.2021**






रयतेचा कैवारी
शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- शाहू संभाजी भारती — डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' (वर्ष ०२ - अंक ३३२) मंगळवार दि. ०७/०९/२०२१ पान १३

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

सोलापूर: दि.०६ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे आय. क्यू. ए. सी., राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग आणि पृथ्वी कुल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ०५ सप्टेंबर २०२१ रोजी ऑनलाईन पद्धतीने शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे तथा व्याख्याते म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष आणि सिल्व्हर ज्युबिली प्रशाला, बार्शीचे मुख्याध्यापक मा. श्री. प्रशांत कोल्हे हे उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त तथा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छ. शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या शुभहस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले. वैभव घुगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. पी. ए. पाटील यांनी सामाजिक ऐक्य पंधरवडा कार्यक्रम अहवाल सादर केला. शिक्षक दिन कार्यक्रम निमित्ताने सोमनाथ लोंढे, शितल लोंढे, आनंद सुतार यांनी विचार व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित मा. श्री. प्रशांत कोल्हे यांनी बदलते शिक्षण, बदलते शिक्षक या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. नवीन शैक्षणिक धोरण २०२० याविषयी माहिती सादर केली. शिक्षकाची भूमिका स्पष्ट केली. ज्ञान, कौशल्ये, मूल्ये विकसित करणारे शिक्षक आज समाजाला हवे आहेत. शिक्षकांनी उपक्रमशीलता जोपासली पाहिजे. आई-वडीलानंतर शिक्षक महत्वपूर्ण आहेत. जीवनाचे मौलिक मार्गदर्शन शिक्षक करतात. बदलत्या काळानुसार शिक्षकांनी अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत बदल केले पाहिजेत. कौशल्याधिष्ठीत शिक्षण ही संकल्पना शिक्षकांनी राबविली पाहिजे. जीवन कौशल्याचे मार्गदर्शन शिक्षकांनी केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व संस्थेचे विश्वस्त डॉ. चंद्रकांत मोरे यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून विशेष मार्गदर्शन केले. शिक्षक ही संकल्पना विस्तृतपणे स्पष्ट केली. शिक्षक या संकल्पनेत शिस्तप्रिय, क्षमाशील व कर्तव्यदक्ष हे गुण समाविष्ट आहेत. त्यांनी शिक्षकाचे विशेष गुण विशद केले. शिक्षकांनी ज्ञान संपदा, आत्मविश्वास, निष्ठा,औदार्य, चारित्र्य संपन्न या पंचसूत्रीचा अवलंब करावा असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी शिक्षक दिन निमित्ताने मौलिक मार्गदर्शन केले. ते म्हणाले, आज माहितीचा प्रस्फोट झाला आहे. शिक्षकांनी कृतीशीलता व नाविन्यता जोपासली पाहिजे. शिक्षक पुस्तकी ज्ञानाबरोबरच जीवन जगण्याचे धडे देतात. शिक्षकांनी आदर्शवत वर्तन व आचरण केले पाहिजे. शिक्षक विद्यार्थ्यांना आत्मविश्वास वाढविण्याचे बळ देतात. व्यक्तिमत्व विकासात शिक्षकांचे योगदान महत्वपूर्ण आहे. समाजाला प्रेरक असे शिक्षक निर्माण झाले पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार पल्लवी भोसले यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिताली अवनावे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एम. एस. डिसले, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, पृथ्वी कुलाचे प्रशिक्षणार्थी, सर्व प्रशिक्षणार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

College of Education, Barshi, Dist-Solapur 413411

Organization of International Conference – 22.12.2021




Organization of Career Guidance by Alumni -



**Celebration of Republic Day – 26.01.2022**






**Celebration of National Science Day – 28.02.2022**



**Organization of Alumni Meet – 09.05.2022**



**Organization of Four Workshops on Yoga Practice – 25th April 2022 To 21st June, 2022**



# रयतेचा कैवारी

संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' - वर्ष तिसरे - अंक २०६ )   शुक्रवार दि.२९/०४/२०२२ पान ०३

## बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात योग प्रशिक्षण-कार्यशाळेचे आयोजन



सोलापूर: दि.२८ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या प्रपत्रानुसार दिनांक २५ एप्रिल ते २१ जून २०२२ या कालावधीत चार सत्रामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन २०२२ या कार्यक्रमांतर्गत योग प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी सांगितली. या योग प्रशिक्षण कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे योग प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. यातील पहिले सत्र दिनांक २५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२२ या कालावधीत घेतले जाणार आहे. या योग प्रशिक्षण कार्यशाळेचा उद्घाटन कार्यक्रम मंगळवार दिनांक २६ एप्रिल २०२२ रोजी श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार माननीय श्री जयकुमार शितोळे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे उपस्थित होते.

यावेळी उद्घाटक तथा संस्थेचे खजिनदार मा. जयकुमार शितोळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग प्रशिक्षण कार्यशाळेच्या आयोजनाचे कौतुक केले. आजच्या गतिमान युगात योग प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. योग आणि प्राणायामांच्या मदतीने आपल्यातली सजगता वाढते. योग आणि ध्यान धारणेमुळे मन सतत आनंदी, प्रसन्न आणि शांत राहते. दैनंदिन कार्यक्रमात योगाचा समावेश केल्यास तर शरीर सशक्त, चपळ आणि लवचिक बनते. रोज न चुकता योगा केल्यास तर शरीराच्या स्नायूंना बळकटी येईल. दैनंदिन जीवनात प्रत्येकाने योग व व्यायाम यासाठी स्वतःचा वेळ राखीव ठेवला पाहिजे. महाविद्यालयात एप्रिल ते जून या तीन महिन्यांच्या कालावधीत योगाची शास्त्रशुद्ध तात्त्विक व प्रात्यक्षिक माहिती विविध तज्ज्ञांच्या माध्यमातून दिली जाणार आहे. ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. असे प्रतिपादन त्यांनी केले. आपण सर्वांनी योगाचे प्रशिक्षण घेऊन एक उत्तम योग शिक्षक व्हावे असे आवाहन त्यांनी केले. या प्रशिक्षण कार्यशाळेसाठी आवश्यक त्या भौतिक सुविधा व मानवी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील असे त्यांनी आश्वासन दिले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी महाविद्यालयातील विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेतला. महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक व क्रीडा मार्गदर्शक यांच्याद्वारे योगाचे निरंतर प्रशिक्षण देण्याची सुविधा महाविद्यालयात असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी व खेळाडूंनी विद्यापीठ, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर योग स्पर्धेत सहभाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी केल्याचे त्यांनी सांगितले. योग प्रशिक्षण कार्यशाळेतून सर्वांनी योगाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन दैनंदिन जीवनात त्याचा अवलंब करावा असे त्यांनी आवाहन केले.

या प्रशिक्षण कार्यशाळेत डॉ. एस. एम. लांडगे यांनी योगासने प्रात्यक्षिके करून घेतली. या कार्यशाळेत योग प्रशिक्षण व ऑनलाईन व्याख्यान यांचे नियोजन करण्यात आले आहे. डॉ. आर. आर. बाग्ल व प्रा. संतोष देशमुख यांनी ऑनलाईन व्याख्यानातून योगाची शास्त्रशुद्ध माहिती दिली. या कार्यक्रमाचे नियोजन बी. पी. एड. विभाग प्रमुख डॉ. एस. एम. लांडगे, समन्वयक डॉ.ए. जी. कावळे, प्रा. एस. एस. सुरवसे, प्रा. पी. पी. नरळे, प्रा. बी. टी. गुड, डॉ. एस. एस. मायकड,प्रा. रोहित डिसले,डॉ. एच. के. बारसकर , प्रा. एस. ए. सावळे यांनी केले. या प्रशिक्षण कार्यशाळेत बी. एड. , बी. पी. एड., एम. एड. व एम. पी. एड. विभागाच्या एकूण १२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ.ए. जी. कावळे यांनी केले. डॉ.एस. एम. लांडगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी. पी. नरळे यांनी केले.

**Organization of Visit to Innovative Organization - 26.03.2022**



**Celebration on Birth Anniversary of 'Let. Karmveer Dr.Mamasaheb Jagdale – Samaj Din'- 04.02.2022**



**Organization of Awareness' Lecture on *'Mazi Vasundhara Canpagain'*-16.12.2021**



रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' — संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष विसरे - अंक ०७५ )  रविवार दि.१९/१२/२०२१ पान १४

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'माझी वसुंधरा अभियान 2.0' संपन्न

बार्शी / सोलापूर : दि. १८ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी व बार्शी नगरपालिका, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित गुरुवार दिनांक १६ डिसेंबर २०२१ रोजी माझी वसुंधरा अभियान 2.0 अंतर्गत वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनासंदर्भात प्रबोधनात्मक व्याख्यान हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील विविध विभागाकडील प्रशिक्षणार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी व एन.एस.एस. स्वयंसेवक यांना वसुंधरा शपथ देण्यात आली. मा श्री. निजाम बद्रू मुलाणी, सामाजिक वनीकरण विभाग, बार्शी यांनी वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन प्रबोधनात्मक व्याख्यान दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. वैभव धुरे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एम. एस. डिसले यांनी प्रमुख पाहुणे मा. श्री. निजाम मुलाणी यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. माझी वसुंधरा अभियान 2.0 अंतर्गत महाविद्यालयात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शपथ वाचन प्रा.डॉ.एम.एस.डिसले यांनी केले.

बी. एड. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी श्री. आशुतोष वाघमारे यांनी माझी वसुंधरा अभियान 2.0 : युवकांची जबाबदारी या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे तथा मार्गदर्शक म्हणून " मा. श्री. निजाम बद्रू मुलाणी, सामाजिक वनीकरण विभाग, बार्शी हे उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी वृक्ष लागवडीचे तंत्र आणि मंत्र, वृक्षांची निवड व अंतर, वृक्ष संवर्धनाचे विविध मार्ग याविषयी उदाहरण देत, दिग्दर्शन केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. एस. एस. गोरे हे होते. अध्यक्षीय समारोपात डॉ. एस. एस. गोरे यांनी माझी वसुंधरा अभियान 2.0 राबविण्यात येत असल्याबद्दल अभिनंदन केले, तसेच वृक्ष लागवडीचे महत्त्व सांगत वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे असे मत विशद केले तसेच जागतिक व भारतीय संदर्भाने वनसंपदेबाबतची माहिती विशद केली. कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार श्री. सूरज हजारे यांनी व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.योगिता गवळी यांनी केले. सदर कार्यक्रमाची सांगता सामुहिक राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बार्शी नगरपालिकेचे श्री. गणेश पाटील व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.एम.एस डिसले आणि सर्व स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी विशेष परिश्रम घेतले.

**Organization of Skill Oriented Activity-Visit to Communication Training Center 03.12.2021**



# भाषण प्रशिक्षण केंद्रास बी. एड. प्रशिक्षणार्थींची भेट

सोलापूर : दि. ४ (स्वतेचा कैवारी,ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील बी. एड. प्रशिक्षणार्थींनी शुक्रवार दिनांक ०३ डिसेंबर २०२१ रोजी भाषण प्रशिक्षण केंद्रास अभ्यास भेट दिली. द आर्ट ऑफ पब्लिक स्पिकिंग या स्किल ओरिएंटेड कोर्सच्या प्रात्यक्षिक पूर्ततेसाठी स्मार्ट अॅकॅडमी भाषण प्रशिक्षण केंद्राला भेट व आवश्यक माहिती जाणून घेणे गरजेचे आहे म्हणूनच या अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते.




यानिमित्ताने स्मार्ट अॅकॅडमीचे संस्थापक, पत्रकार व व्याख्याते सचिन वायकुळे यांनी बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. भाषण कौशल्य विकसित करण्यासाठी आवश्यक बाबींची माहिती दिली. भाषण कौशल्य विकसित करण्यासाठी प्रथमतः संभाषण उत्तम असावे.माहितीचे संकलन आणि प्रभावी सादरीकरण आवश्यक आहे. संभाषण हीच भाषणाची सुरुवात आहे. निरीक्षण, आत्मविश्वास, आशयाचे सखोल ज्ञान, श्रोते, भाषाशैली हे घटक उत्तम वक्ता होण्यासाठी उपयुक्त ठरतात. घरातूनच संवादाची सुरुवात करा. आई-वडिलांसोबत संवाद साधा. उत्तम वक्ता होण्यासाठी समृद्ध वाचन करावे असे त्यांनी आवाहन केले.

यावेळी प्रा. डॉ. एस. डी. भिलेगावकर, डॉ. आर. ए. फुरडे व डॉ. एम. व्ही. मते यांनी समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरसिंह गोडगे यांनी केले. प्रदीप सुतार यांनी प्रमुख व्याख्याते यांचा परिचय करून दिला. आभार अमर क्षिरसागर यांनी तर सूत्रसंचलन पल्लवी भोसले यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, विभाग प्रमुख प्रा.डॉ. एस.डी भिलेगावकर, डॉ.आर.ए. फुरडे, डॉ. एम. व्ही. मते, तसेच बी. एड. प्रशिक्षणार्थी यांनी प्रयत्न केले.

College of Education, Barshi Dist.-Solapur 413411

**Organization of Good Governance Day Awareness' Programme –**
**$20^{th}$ Aug., to $05^{th}$ Nov., 2021**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

## सद्भावना दिनानिमित्त सामाजिक ऐक्य पंधरवडा

दिनांक २०.०८.२०२१ ते ०५.०९.२०२१

**स्पर्धात्मक उपक्रम वेळापत्रक**

| अनु. क्र. | दिनांक | स्पर्धा/ उपक्रम | स्पर्धा /उपक्रमाचे स्वरूप | स्पर्धा समन्वयक व वॉटसअॅप संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ | २०.०८.२०२१ | सद्भावना दिन व सामाजिक ऐक्य पंधरवडा उद्घाटन | व्याख्यान सकाळीठीक १०.३० वा. व्याख्याता -डॉ संध्या पांडे, सेवानिवृत्त, सहयोगी प्राध्यापिका, समाज कार्य विभाग, डॉ बा आं म वि, औरंगाबाद. | डॉ पी.ए.पाटील मो.नं. ९८९०६२७१७९ |
| २ | २१.०८.२०२१ | रांगोळी स्पर्धा | धार्मिक ऐक्य विषयावर रांगोळी काढून फोटो पाठवावा | मानसी निंबाळकर मो. नं- ९३७३७२३१८० |
| ३ | २२.०८.२०२१ | रक्षाबंधन | अनोख्या पध्दतीने (उदा .झाडाला राखी बांधून) रक्षाबंधन साजरे करून फोटो पाठवणे | कौसर मुलाणी मो. नं- ९९२२७००८१३ |
| ४ | २३.०८.२०२१ | पोस्टर स्पर्धा | सामाजिक ऐक्य या विषयावर पोस्टर तयार करून फोटो पाठवावा | प्रतिक्षा मुंढे मो. नं- ९८३४५२७५०५ |
| ५ | २४.०८.२०२१ | Whatsapp Dp or Status स्पर्धा | राष्टीय एकात्मता या विषयावर Whatsapp Dp or Statusठेवून Sceen Shot पाठवावा | प्रगती मुंढे मो. नं- ९८३४५०४२५६ |
| ६ | २५.०८.२०२१ | Face book Post स्पर्धा | सामाजिक ऐक्य या विषयावर पोस्टर तयार करून फोटो पाठवावा | अमर क्षीरसागर मो.नं.- ७७७५९०९१४० |
| ७ | २६.०८.२०२१ | वृक्षारोपन | आपल्या परिसरात सार्वजनिकठीकाणी किमान एक वृक्ष रोपन करून त्यासोबतचा Geotagफोटो पाठवावा. | प्राजक्ता मुकटे मो. नं- ९८३४५०४२५६ |
| ८ | २७.०८.२०२१ | सार्वजनिक स्वच्छता | आपल्या परिसरातील सार्वजनिकठीकाणाची स्वच्छता करून Geotag फोटो पाठवावा. | हरी मुकटे मो. नं- ८४८५८२७८८३ |
| ९ | २८.०८.२०२१ | काव्यवाचन स्पर्धा | सामाजिक व देशभक्तीपर स्वलिखित अथवा प्रसिध्द कवींच्या कवितांचे वाचन | सोमनाथ लोंढे मो. नं- ८९९९४५५९०५ |
| १० | ३०.०८.२०२१ | निबंध स्पर्धा | राष्टीय एकता व अखंडतेतील भाषेच्या वैविध्याची भूमिका | अंजली मुंढे मो. नं- ९१७२५८०७१० |
| ११ | ०१.०९.२०२१ | घोषवाक्य स्पर्धा | सामाजिक व राष्टीय ऐक्य | दत्तराज मोराळे मो.नं.- ९१४६४२२०५० |
| १२ | ०२.०९.२०२१ | Quiz Competition | सद्भावना दिनाशीसंबधित २० गुणांची बहूपर्यायी प्रश्नमंजूषा Google Form द्वारे | सागर राऊत मो.नं.- ९८३४०४५३४५ |
| १३ | ०३.०९.२०२१ | | विद्यार्थी मनोगत व प्रत्याभरण | प्रमिला नाईकवाडी मो.नं.८६६८३३८६९० |
| १४ | ०४.०९.२०२१ | | स्पर्धा निकाल तयार करणे | |
| १५ | ०५.०९.२०२१ | सामाजिक ऐक्य पंधरवडा समारोप | शिक्षक दिन कार्यक्रमात प्रमाणपत्र वितरण | |

| डॉ पी.ए.पाटील | डॉ एस.डी. भिलेगावकर | डॉ एस.एस.गोरे |
|---|---|---|
| समन्वयक, शौर्य कुल | बी.एड. व सांस्कृतिक विभाग प्रमुख | प्राचार्य |

संयोजक : सांस्कृतिक विभाग : शौर्य कुल

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

महत्वाची सूचना -सर्व विद्यार्थ्यांनी COVID- १९ नियमांचे पालन करून व घरी राहूनच ऑनलाईन पध्दतीने प्रत्येक स्पर्धा व उपक्रमात आपला सक्रिय सहभाग नोंदवावा.

**Organization of International Conference on Post COVID World- 27.11.2021**

# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' – संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष पहिले - अंक ०४८ ) सोमवार दि.२२/११/२०२१ पान ०७

## बार्शीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

सोलापूर: दि. २१ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संस्थापित श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे शनिवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजी एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय "इमर्जिंग ट्रेंड्स ऑफ एज्युकेशन इन पोस्ट कोविड वर्ल्ड" हा आहे.

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. शिक्षणाच्या सर्वच स्तरावर ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा स्वीकार केला जात आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन, प्रशिक्षण आदि क्षेत्रांची परिमाणे व्यापक होत आहेत. शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रम राबविण्यात देखील ऑनलाईन प्रणालीचा प्रभावी वापर दिसून येत आहे. म्हणूनच महाविद्यालयाने एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. कोविडोत्तर जगातील शिक्षणाचे उदयोन्मुख प्रवाह याविषयी माहिती घेणे गरजेचे असल्याचे लक्षात घेऊन ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित केली आहे.


या परिषदेचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु मा. डॉ. मृणालिनी फडणवीस या करणार आहेत. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष



म्हणून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष श्री. एन. एन. जगदाळे, जनरल सेक्रेटरी श्री. पी. टी. पाटील, सहसचिव श्री. ए. पी. देबडवार, खजिनदार श्री. जे. सी. शितोळे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त व सदस्य हे

देखील परिषदेसाठी ऑनलाईन सहभागी होणार आहेत. परिषदेसाठी मुख्य साधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून सौदी अरेबिया येथील प्रोफेसर डॉ. कौकब अझीम हे मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत कोविडोत्तर जगातील ई-लर्निंग अध्यापनशास्त्र आणि ब्लेंडेड शिक्षण प्रणाली, बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास संशोधने, महामारी आणि मानवी जीवनशैली, कोविडोत्तर जगातील शारीरिक फिटनेस आणि निरोगीपणा या उपविषयावर संशोधन पेपर सादरीकरण केले जाणार आहे. प्रत्येक उपविषयावर आधारित एक उत्कृष्ट संशोधन पेपर अवॉर्ड दिला जाणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील आणि परदेशातील शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आदी सहभागी होणार आहेत. परिषदेतील संशोधन पेपरचे नामांकित संशोधन मासिकात प्रकाशन करण्यात येणार आहे. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन परिषदेमध्ये जास्तीत जास्त इच्छुकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे (९८५०३६८३८५), आयक्युएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे (९५२७१७०४६१), परिषदेचे समन्वयक प्रा. पी. पी. गरडे (८६००१९७२७८ ) व सहसमन्वयक डॉ.एम. व्ही. मते (९८८१३७६७००) व आयोजन समिती यांनी केले आहे.

**Organization of Online Guidance Session on 'How to preparation Research Paper' by our Alumni Madhuri Madam - 08.07.2021**



**Organization of One week Online Workshop on Research Methodology- 18-24 Oct., 2021**




पुढारी

News by
गणेश गोडसे,बार्शी

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात संशोधन कार्यपद्धतीवर कार्यशाळा

**बार्शी : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे आयक्यूएसी आणि संशोधन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन कार्यपद्धतीवर ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात झाली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे होते.

महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे मान्यताप्राप्त शिक्षणशास्त्र विषयाचे संशोधन केंद्र आहे, तसेच महाविद्यालयात शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम राबविले जातात. एम.एड्., एम.पी. एड्. व पीएच.डी. विद्यार्थ्यांना संशोधन कार्यपद्धतीसंदर्भात उद्‌बोधन व्हावे, या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या ऑनलाईन कार्यशाळेत प्रा. डॉ. एस.डी. भिलेगावकर, डॉ. युवराज पवार, डॉ. सचिन सलगर, डॉ. महेश कळलावे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. एम.एस. डिसले यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी प्रा. पंकज नरळे, डॉ. एम. व्ही. मते, डॉ. एम. एस. डिसले, डॉ. पी. ए. पाटील, डॉ. एस. एल. जाधव व डॉ. एल. आय. राठोड यांनी सत्रसमन्वयक म्हणून काम पाहले. या कार्यशाळेत संशोधन कार्यपध्दतीसंदर्भात अधिकतम माहिती देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व संशोधकांनी या माहितीचा त्यांच्या संशोधनासाठी वापर करावा. संशोधन प्रक्रियेतील मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. संशोधन ही व्यापक व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन साधने, माहिती संकलन व विश्लेषण या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. संशोध अहवाल लेखन प्रभावी असणे गरजे असते. एकंदरीतच संशोधन प्रक्रिय राबवताना अनेक समस्या निर्माण होतात. संशोधन प्रक्रिया अधिव गतिमान व गुणवत्तापूर्ण व्हावी यासाठी संशोधन विद्यार्थी व संशोध मार्गदर्शक यांनी प्रयत्न करावेत, अ त्यांनी आवाहन केले. महाविद्याल प्राचार्य डॉ. एस.एस. गोरे, डॉ. व्ही पी. शिखरे, समन्वयक डॉ. एल आर राठोड, सहसमन्वयक डॉ. एम.एस डिसले यांनी प्रयत्न केले.

My Solapur Edition
Oct 26, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in




**Creear Guidance Session on Understanding the self & Goal Setting – 09.09.2021**

# विद्यार्थ्यांनो, तुमचे ध्येय तुम्हीच निश्चित करा – विजयश्री पाटील





सोलापूर: दि. १०(स्वातेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे गुरुवार दिनांक ०९/०९/२०२१ रोजी आय. क्यू. ए. सी., सांस्कृतिक विभाग, अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष व्याख्यानाचा मुख्य विषय "माझे महाविद्यालय, माझी जबाबदारी" असा होता. यासाठी प्रमुख व्याख्यात्या म्हणून बार्शी येथील तज्ञ समुपदेशिका व मेहेर विद्यालयाच्या संचालिका मा. प्रा. श्रीमती विजयश्री पाटील या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे होते.

प्रमुख व्याख्यात्या मा. प्रा. श्रीमती विजयश्री पाटील यांनी विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील भूमिका विशद केली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात महाविद्यालयाचे योगदान महत्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांची जडणघडण महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या उपक्रम व कार्यक्रमातून होत असते. विद्यार्थ्यांनी मूलभूत पाच भूमिका पार पाडल्या पाहिजेत. यात त्यांनी नैतिक, सामाजिक, शैक्षणिक, भावनिक व तात्विक भूमिका सविस्तर विशद केल्या. विद्यार्थ्यांनी ज्ञानाचे विविध पैलू अनुभवले पाहिजेत. समाजात सहज ओळख निर्माण झाली पाहिजे. सामाजिक भान जपले पाहिजे. शिक्षणाचे विविध आयाम लक्षात घ्यावेत. म्हणूनच विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय स्वतः निश्चित केले पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील भूमिका सविस्तर विशद केली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील समृद्ध भौतिक व मानवी उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा. भविष्यातील यशस्वी भूमिका पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांनी विशेष गुण विकसित केले पाहिजेत. सामाजिक दृष्टिकोन व्यापक केला पाहिजे. योग्य नियोजन व अथक परिश्रमातून फलश्रुती होते, यावर भर दिला पाहिजे. महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण विकासात विद्यार्थ्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. समन्वयक प्रा. सौ. एस. एस. सुरवसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार प्रा. सविता दुधभाते यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एल. आय. राठोड यांनी केले.

College of Education, Barshi, Dist. Solapur 413411

**Successful Completed Ten Months Plantations Campaign Alumni is Actively Participated – June 2021 to March 2022**




# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न

बार्शी (प्रतिनिधी) : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रविवार दि. १९ वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी एकूण वेगवेगळ्या सुमारे ६० रोपांची लागवड महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आली.




वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन कार्यक्रमासाठी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे जनरल सेक्रेटरी प्रकाश पाटील, विश्वस्त तथा माजी प्राचार्य डॉ चंद्रकांत मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, विविध विभागाचे विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एस. डिसले, शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी डॉ. एम एस डिसले यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

संस्थेचे जनरल सेक्रेटरी प्रकाश पाटील म्हणाले की वृक्षलागवडीबरोबरच वृक्षांचे जतन व संवर्धन आवश्यक आहे. झाडे वाचवण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. पर्यावरण समतोल राखण्यासाठी वृक्षलागवड हा महत्वपूर्ण प्रकल्प आहे. वृक्षलागवड हा चिरंतन प्रकल्प आहे. यात सातत्य राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे यांनी वृक्षलागवड उपक्रमाचे कौतुक केले. पर्यावरण जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. एस एस गोरे यांनी पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षलागवड उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. त्यांनी स्वतः तयार केलेल्या एकूण ६० रोपांची लागवड करण्यात आली. मार्च २०२२ अखेर पर्यंत एकूण २००० वृक्षलागवड करण्याचे निश्चित केले आहे. यामुळे पर्यावरण संरक्षण, संवर्धन व जाणीव जागृती होण्यास मदत होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. डॉ. एम एस डिसले यांनी वृक्षलागवड ही लोकचळवळ करण्याचा प्रयत्न असल्याचे सांगितले. डॉ. एस डी भिलेगावकर यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले.

## Celebration of National Sports Day – 29.08.2021






# रयतेचा कैवारी

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- शाहू संभाजी भारती -- डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' (वर्ष दुसरे - अंक ३२४) सोमवार दि.३०/०८/२०२१ पान ०४

## सुजाण नागरिक घडविण्यात खेळाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.- रमेश पाटील

### बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

सोलापूर : दि.२९ (रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे रविवार दिनांक २९/०८/२०२१ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन ऑनलाईन स्वरूपात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे खजिनदार श्री. जयकुमार शितोळे व माजी विद्यार्थी तथा माजी नगराध्यक्ष मा. श्री. रमेश पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. बी. पी. एड. विभागप्रमुख डॉ. सुरेश लांडगे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच शारीरिक शिक्षण व क्रीडाचे महत्त्व विशद केले. प्रमुख पाहुणे मा.श्री. रमेश पाटील यांनी क्रीडा दिनाचे महत्त्व विशद केले. सुजाण नागरिक घडविण्यात क्रीडा व खेळ यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात क्रीडा व खेळ महत्त्वाचे आहेत. खेळाच्या सहभागातून शारीरिक पातळीवर चांगल्या प्रकारे विकास होतो. मानसिक आरोग्य चांगले राहते. आत्मविश्वास वाढला जातो. म्हणूनच सर्वांनी क्रीडा व खेळ याविषयी आवड निर्माण करावी असे आवाहन केले.

संस्थेचे खजिनदार मा.श्री. जयकुमार शितोळे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा सविस्तर आढावा घेतला. मेजर ध्यानचंद यांनी आठ सुवर्णपदक प्राप्त करून हॉकी खेळामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षण महत्त्वाचे आहे. भारतीय खेळाबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित झाला पाहिजे. खेळाडूंची संख्या वाढली पाहिजे. क्रीडा शिक्षकाची यात मोठी जबाबदारी आहे. विविध खेळ व क्रीडा प्रकारातून खेळाडूंचा समतोल व सर्वांगीण विकास होतो. "जगप्रसिध्द कबड्डी भारतीय खेळ" असे काव्य स्वरूपात त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे यांनी राष्ट्रीय क्रीडा दिन विषयी माहिती विशद केली. राष्ट्राच्या विकसनात खेळाडूंचे योगदान उल्लेखनीय आहे. व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी बोधात्मक व भावात्मक घटकाबरोबर क्रियात्मक विकास महत्त्वाचा आहे. क्रीडा व खेळ याविषयी शास्त्रीय माहिती घेतली पाहिजे. शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाकडे गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे. शिक्षणाच्या सर्व स्तरावर खेळाडू तयार झाले पाहिजेत. प्रशासकीय स्तरावर आणि लोकप्रतिनिधी यांनी क्रीडा व खेळ याकडे विशेष लक्ष द्यावे असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. ए. जी. कांबळे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांचा परिचय प्रा. स्मिता सुरवसे यांनी करून दिला. उपस्थितांचे आभार डॉ. एस. एस. गायकवाड यांनी मानले. सूत्रसंचलन प्रा. पंकज गरड यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने ऑनलाईन उपस्थित होते.



**Celebrations of Birth Anniversary of Anna Bhau Sathe & P A H Solapur University Day – 01.08.2021**




रयतेचा कैवारी
शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक
संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक २९८ बुधवार दिनांक ०४/०८/२०२१ पान ०८

## संशोधन व कौशल्यविकसन अभ्यासक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अग्रेसर - डॉ. शिवाजी शिंदे

सोलापूर:दि.०३ ( रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथे सांस्कृतिक विभाग, पृथ्वी कुल व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांचे संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ०१ ऑगस्ट २०२१ रोजी दुपारी ठीक ०४.३० वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ १७ वा वर्धापन दिन, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती या ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे उपस्थित होते.

यावेळी डॉ. शिवाजी शिंदे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सविस्तर व मौलिक मार्गदर्शन केले. सुरुवातीला लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे कार्य सविस्तर विशद केले. विद्यापीठ वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, शैक्षणिक वर्ष २००४-०५ मध्ये स्थापन झालेल्या सोलापूर विद्यापीठाची यशस्वी कामगिरी राहिली आहे. विद्यापीठाने दर्जेदार स्वरूपाचे अनेक अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत. अध्ययन, अध्यापन, संशोधन व मूल्यमापन क्षेत्रात विद्यापीठाने यश संपादन केले आहे. अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थी व शिक्षक प्रभावी कामगिरी करत आहेत. विद्यार्थी केंद्रित शिक्षणप्रणाली राबविण्यावर विद्यापीठाचा नेहमीच भर राहिला आहे. अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या कला- गुणांना वाव देण्याचे काम




विद्यापीठाच्या वतीने केले जात आहे. रोजगाराभिमुख शिक्षणप्रणालीतून अनेक विद्यार्थ्यांना रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. कला,विज्ञान, क्रीडा, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, एन. सी. सी., कृषी, तंत्रज्ञान, वाणिज्य, अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र आदी अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची जडणघडण केली जात आहे. संशोधन व कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम राबविण्यात विद्यापीठ अग्रेसर राहिले आहे. क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना फायदेशीर ठरत आहेत. कोविड - १९ कालावधीत ऑनलाईन मूल्यमापन प्रणाली राबविण्यात इतर विद्यापीठाच्या तुलनेत सोलापूर विद्यापीठाने प्रभावी यश संपादन केले आहे. यामुळे अल्पावधीतच विद्यापीठ लोकप्रिय झाले आहे. विद्यापीठाच्या या यशस्वी कामगिरीत अनेक समाजघटकांचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय कार्याची माहिती दिली. अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक व साहित्यिक कार्य विशद केले. सोलापूर विद्यापीठ वर्धापन दिनाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या नाविन्यपूर्ण कामगिरीचे विवेचन केले. समृद्ध मानवी व भौतिक सुविधांच्या जोरावरच विद्यापीठ प्रगती करत आहे. कौशल्य आधारित शिक्षण प्रणाली राबविली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार कार्यप्रणाली राबविण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. यामुळे शिक्षणक्षेत्रात अनेक सकारात्मक बदल पाहावयास मिळतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैभव घुगे यांनी केले. मिताली अबनावे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख प्रोफेसर डॉ. एस. डी. भिलेगावकर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रोफेसर डॉ. व्ही. पी. शिखरे, कुल मार्गदर्शक डॉ. एम. एस. डिसले, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, पृथ्वी कुल आदींनी योगदान दिले.

College of Education, Barshi, Dist. Solapur 413411

## Celebration of International Yoga Day – 21.06.2021


# रयतेचा वाली

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक २५८ मंगळवार दिनांक २२/०६/२०२१ पान ०६


## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

सोलापूर:दि. २१(रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे सोमवार दिनांक २१ जून २०२१ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने ७ व्या आंतरराष्ट्रीय योगा दिन ऑनलाईन कार्यक्रमाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सहसचिव श्री. पी. टी. पाटील व खजिनदार प्रा. डी. एस. रेवडकर आदि मान्यवर ऑनलाईन उपस्थित होते. यावेळी पुणे येथील प्रमुख साधन व्यक्ती तथा सुप्रसिद्ध योगाचार्य डॉ. अमोल पाटील यांनी आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्ताने योगा प्रात्यक्षिकासह सविस्तर माहिती दिली. योगासनाचे विविध प्रकार विशद केले. यात त्यांनी ध्यान, ताडासन, मकारासन, वज्रासन,वक्रासन आदींविषयी माहिती सांगितली.




विद्यार्थ्यांनी नियमित योगासने केली पाहिजेत. योगासनामुळे मन आनंदी व शांत राहते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यात योगासनांची भूमिका महत्वाची आहे. योगासने विषयी शास्त्रशुध्द माहिती देऊन आनंदी जीवनासाठी प्रेरणादायी संदेश दिला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी नियमित व्यायाम व योगासने केली पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे औचित्य साधून मौलिक मार्गदर्शन केले. योगाला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होतो. दैनंदिन ताण तणावापासून मुक्तता मिळते. मन आनंदी व एकाग्र राहते. रोग प्रतिकार शक्तीत वाढ होते. रोजच्या धावपळीच्या जीवनात आनंदी राहण्यासाठी योगासने केली पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ए. जी. कांबळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी.पी. नरळे यांनी केले. उपस्थितांचे आभार बी. पी. एड. विभाग प्रमुख डॉ. एस. एम. लांडगे यांनी मानले. प्रमुख साधन व्यक्ती डॉ.अमोल पाटील यांचा परिचय प्रा.सौ.एस. एस. सुरवसे यांनी करून दिला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांचा परिचय डॉ. एस. एस. मारकड यांनी केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एम. लांडगे, राष्ट्रीय सेवा योजना सर्व स्वयंसेवक, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.

College of Education, Barshi, Dist. Solapur 413411

## Celebration of *National Vachan Prerana Day* – 19.06.2021



# रयतेचा वाली

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

संपादक :- श्री. शाहू संभाजी भारती ( ९९७५७३८३२१ ) वर्ष दुसरे - अंक २५६ रविवार दिनांक २०/०६/२०२१ पान ०२

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय वाचन दिन उत्साहात साजरा

सोलापूर: दि.१९.(रयतेचा वाली, ऑनलाईन वृत्तसेवा) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे शनिवार दिनांक १९ जून २०२१ रोजी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, ग्रंथालय विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने राष्ट्रीय वाचन दिन कार्यक्रमाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे उपस्थित होते.

मा. विभागीय सहसंचालक(उ.शि.) सोलापूर यांच्या परिपत्रक जावक क्रमांक विसस/उशि/सोविसो/२०२१/८५७, दिनांक १६ जून २०२१ नुसार दिनांक १९ जून २०२१ हा दिवस राष्ट्रीय वाचन दिन म्हणून साजरा करण्यासाठी महाविद्यालयांना सूचित केलेले आहे. त्यानुसार शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी ग्रंथालय विभागाच्या वतीने दिनांक १९ जून २०२१ हा दिवस राष्ट्रीय वाचन दिन म्हणून साजरा करण्यात आला. महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी इतर साहित्याचेही जास्तीत जास्त वाचन करावे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने "राष्ट्रीय वाचन दिन" चे आयोजन केले जात आहे. केरळ हे भारतातील सर्वात जास्त साक्षरता असणारे राज्य आहे. याच साक्षरतेच्या कामात महत्त्वाचा वाटा उचलणारे आणि केरळ राज्य ग्रंथालय चळवळीचे जनक पी. एन. पानिकर यांच्या स्मरणार्थ १९ जून हा केरळमध्ये वाचन दिन म्हणून साजरा केला जातो. सन २०१७ मध्ये मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १९ जून हा राष्ट्रीय वाचन दिन म्हणून साजरा करावा असे घोषित केले.

यावेळी प्रमुख वक्ते डॉ. आर. ए. फुरडे यांनी वाचन दिन याविषयी सविस्तर माहिती दिली. भाषेची एकूण चार कौशल्ये आहेत. यात श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन याचा समावेश होतो. विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासली पाहिजे. वाचनाने मन संस्कारित होते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यात वाचनाची भूमिका महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन केले पाहिजे. आनंदी जीवन जगण्यासाठी वाचन महत्वाचे आहे. वाचते व्हा असा प्रेरणादायी संदेश दिला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध भाषेतील साहित्य वाचन केले पाहिजे असे आवाहन केले. ग्रंथपाल डॉ. एस. एल. जाधव यांनी देखील राष्ट्रीय वाचन दिन यानिमित्ताने मार्गदर्शन केले. वाचनाने अनुभव प्रगल्भ होतो. वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी सर्वांनी निरंतर वाचन करावे. यावेळी त्यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची माहिती विशद केली. ग्रंथालयातील विपुल ग्रंथ संपदा स्पष्ट केली. सर्वांनी वाचन संस्कृती जोपासावी असे त्यांनी आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी राष्ट्रीय वाचन दिनाचे औचित्य साधून मौलिक मार्गदर्शन केले. वाचनाला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. विविध भाषेतील साहित्याचा प्रस्फोट झाला आहे. विपुल साहित्य संपदा उपलब्ध आहे. दररोज वर्तमानपत्र, मासिके व नियतकालिके यांचे वाचन केले पाहिजे. वाचन करताना नोंदी कराव्यात. केरळमध्ये पी.एन.पानिकर यांनी ग्रंथालय वाचन चळवळ सुरु केली. यानिमित्ताने वाचन दिन साजरा करण्यात येत आहे. प्रभावी वैचारिक देवाणघेवाण करण्यासाठी निरंतर वाचन केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा बी. एड. विभाग प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन तब्बसून पटेल यांनी केले. उपस्थितांचे आभार पल्लवी भोसले यांनी मानले. प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी परिश्रम घेतले.

## Demonstration by Sports Skills by Alumni - 12.10.2019



**Guidance Session on Computational Examination in Education – 6.5.2022**




College of Education, Barshi
Dist-Solapur 413411

**Celebration of Constitution Day – 26.11.2021**




**रयतेचा कैवारी**

शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक

!! जन्मदिन अभिष्टचिंतन !!
चि. विश्वास शाहू भारती

डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी' -- संपादक :- शाहू संभाजी भारती ( वर्ष तिसरे - अंक ०५४ ) रविवार दि.२८/११/२०२१ पान ०७

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत संविधान दिवस व संविधान जनजागृती मोहिमेचे उद्घाटन संपन्न



सोलापूर: दि. २८(रयतेचा कैवारी, ऑनलाईन वृत्तसेवा) शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व 'पृथ्वी कुल' यांच्या वतीने आयोजित शुक्रवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विविध विभागाकडील प्रशिक्षणार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या ऑनलाईन उपस्थितीत संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री वैभव घुगे यांनी केले. प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले. प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या भित्ती पत्रकाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर दि.२६.११.२०२१ ते २६.१२.२०२१ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या संविधान जनजागृती मोहिमेचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयातील ऑनलाईन उपस्थित प्रशिक्षणार्थी तसेच उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. तसेच 'माझे संविधान माझा अभिमान' या उपक्रमाचे संविधान मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी व एन.एस.एस. स्वयंसेवक यांना राष्ट्रीय एकात्मता शपथ देण्यात आली. शपथ वाचन बी.एड. प्रशिक्षणार्थी कु. मानसी निंबाळकर हीने केले व भारतीय संविधान उद्देशिका याचे वाचन प्रा.डॉ.एम.एस.डिसले यांनी केले. बी. एड. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थी श्री. आशुतोष कापसे व यांनी भारतीय संविधानाची ओळख या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले, तर श्री. प्रदिप सुतार यांनी भारतीय नागरिकांची मूलभूत हक्क व कर्तव्ये या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख मा. प्रा. डॉ. पंडित लावंड हे उपस्थित होते, आपल्या मनोगतात त्यांनी संविधान दिन हा लोकोत्सव व्हावा, केवळ सोपस्कार नको, असे मत व्यक्त केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. एस. एस. गोरे हे होते. अध्यक्षीय समारोपात डॉ. एस. एस. गोरे यांनी भारतीय संविधानाचा आढावा विशद केला तसेच भारतीय संविधानातील मूल्ये व मार्गदर्शक तत्वे यांची माहिती विशद केली. कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार श्री. शुभम जाधवर यांनी व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.स्नेहल गुरव यांनी केले. सदर कार्यक्रमाची सांगता सामुहिक राष्ट्रगीताने झाली.

## Organization of Alumni Meet- 07.11.2021



एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ ।।

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

## माजी विद्यार्थी कल्याणकारी संस्था

**बी.पी.एड. बॅच १९९८-९९**

# स्नेह मेळावा

**रविवार दि. ७/११/२०२१ ● सकाळी ११ वा.**

**✲ कार्यक्रम पत्रिका ✲**

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | : डॉ. ए. जी. कांबळे |
| प्रतिमा पूजन | : मान्यवरांच्या हस्ते |
| मान्यवरांचा सत्कार | : |
| मनोगत | : १. माजी विद्यार्थी<br>२. समन्वयक/शिक्षक |
| मार्गदर्शन | : प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे<br>: मा. श्री पी. टी. पाटील<br>जनरल सेक्रेटरी, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी |
| अतिथी मार्गदर्शक | : मा. श्री रामदास शेळके पोलीस निरीक्षक, बार्शी<br>मा. प्रा. प्रविण गाढवे बार्शी |
| अध्यक्षिय समारोप | : मा. डॉ. बी. वाय. यादव<br>अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी |
| आभार | : बी.पी.एड. विद्यार्थी |
| सूत्रसंचालन | : बी.पी.एड. विद्यार्थी |

● स्थळ : शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी, जि. सोलापूर


माजी विद्यार्थी स्नेह मेळावा
GPS Map Camera
Barshi, Maharashtra, India
6MHJ+GPP, Shivaji Nagar, Chatrapati Colony, Barshi,
Maharashtra 413401, India
Lat 18.228566°
Long 75.681504°
09/05/22 12:03 PM
Google


शिक्षण महाविद्यालय बार्शी

**Awareness' Programme on COVID-19**




**Calibrations of *Jijavu Jayanti* – 12.01.2022**



रयतेचा कैवारी
शैक्षणिक समृद्धीसाठी कटिबद्ध डिजिटल दैनिक
दैनिक 'रयतेचा कैवारी' @ संपर्क :- ९९७५७३८३२१
( वर्ष तिसरे - अंक १०० ) गुरुवार दि.१३/०१/२०२२ पान ०७

# बार्शी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जिजाऊ जयंती आणि युवक दिन उत्साहात साजरा




सोलापूर: दि.१२(ऑनलाईन वृत्तसेवा, रयतेचा कैवारी) श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सांस्कृतिक विभाग, पृथ्वी कुल व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक १२ जानेवारी २०२२ रोजी "जिजाऊ जयंती आणि युवक दिन" कार्यक्रमाचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून, श्री शिवाजी महाविद्यालय बार्शीचे प्रा. डॉ. राहुल पालके हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे हे होते.


यावेळी प्रा.डॉ.राहुल पालके यांनी राष्ट्रमाता जिजाऊ जयंती ,स्वामी विवेकानंद जयंती, युवक दिन निमित्ताने मौलिक मार्गदर्शन केले. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी वर्षांमध्ये स्वामी विवेकानंद जिजाऊंच्या विचारांचा जागर करणे महत्त्वाचे आहे. युवक हा ध्येयवादी, विवेकी, विज्ञानवादी, आत्मविश्वासू, जिद्दी व तेजोमय असावा. पृथ्वीच्या संरचनेत आहे तसाच युवक नाही का? पण गरज आहे त्यातील ऊर्जेची योग्य उपयोजन करण्याची गरज आहे स्वतःला सिद्ध करण्याची. थांबतो तो युवक काय? असा प्रश्न त्यांनी युवकांना उपस्थित केला. आजचा युवक हा स्वामी विवेकानंद सारखा असावा, जिजाऊ चे संस्कार घराघरात पोहोचले पाहिजेत हे संस्कार जर तरुणावर झाले तर नक्कीच छत्रपती शिवाजी महाराजांसारखा युवक तयार होईल असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी जिथे स्त्रियांना शिक्षण घेणे शक्य नव्हते त्या काळात स्त्रियांसाठी आदर्श निर्माण करणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ यांचे चरित्र स्त्रियांनी नुसते वाचून चालणार नाही तर आचरणात आणले पाहिजे असे प्रतिपादन केले विवेकानंदांच्या स्वप्नातील युवक तयार होण्यासाठी तरुणांनी आत्मपरीक्षण करायला हवे असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमासाठी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. रविराज फुरडे यांनी केले. वैभव घुगे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. गीतांजली क्षिरसागर,अल्पना पिंपळे यांनी अनुक्रमे स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे आभार सुरज हजारे यांनी मानले. स्नेहल गुरव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमापूर्वी स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवन चरित्रावर ऑनलाइन इ-प्रश्नमंजुषा घेण्यात आली व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले या स्पर्धेसाठी ८० हून अधिक प्रशिक्षणार्थींनी भाग घेतला होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. व्ही. पी. शिखरे, सांस्कृतिक प्रमुख डॉ. एस. डी. भिलेगावकर, एन.एन.एस. कार्यक्रम अधिकारी तथा पृथ्वी कुलाचे मार्गदर्शक डॉ. एम. एस. डिसले, पृथ्वी कुलाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

College of Education, Barshi, Dist. Solapur 413411

## Organization/Participation of National Conference on 27.11.2021



Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's

# College of Education, Barshi

725, G, Shivaji Nagar, Barshi - 413 411,
Dist. Solapur, Maharashtra State (India)
www.coebarshi.org.in

**IQAC, College of Education, Barshi**

Organizes in collaboration with

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

**ONLINE INTERNATIONAL CONFERENCE**

on

# "EMERGING TRENDS OF EDUCATION IN POST COVID WORLD"

**Saturday, 27th November, 2021**



**Dr. Sugriv Shrimant Gore**
Principal
**College of Education, Barshi**
Mobile No. : 98503 68385

College of Education, Barshi, Dist. Solapur 413411





**Orgnized Sweeming Compitation In Colaboration with Rotary Club of Barshi – 26.03.2022**




